# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती कॅशलेसच्या स्वरूपात देणेबाबत

**(१) ३९५३ (१५-०७-२०२०) श्री.कपिल पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सावित्रीबाई फुले-फातिमा शेख कॅशलेस कुटुंब आरोग्य योजना लागू करण्याबाबत शिक्षक भारती संघटनेनी मागणी केली असून त्यानुषंगाने राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना ही कॅशलेसच्या स्वरूपात देण्याबाबत सर्व प्रकारची माहिती शासनाने शाळांकडून घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॅशलेश प्रतिपूर्ती योजना शिक्षकांना तात्काळ लागू करण्याबाबत मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासित करुनही शिक्षकांना सदरहू योजना लागू झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेश वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०४-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

तथापि, कॅशलेस प्रतिपूर्ती योजनेबाबत विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास सार्वजनिक आरोग्य विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाने असहमती दर्शवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पातूर-शिर्ला (जि.अकोला) परिसरातील फुलशेती व्यवसाय लॉकडाऊनमुळे बंद पडल्याबाबत

**(२) ४६१० (१५-०७-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पातूर-शिर्ला (जि.अकोला) परिसरातील पाचशे एकरवरील लाखो रुपयांची उलाढाल असणारा फुलशेती व्यवसाय लॉकडाऊनमुळे बंद पडल्याने तीनशे शेतकरी व सहाशे फुलशेती मजुर बेरोजगार होऊन रुपये ५० लाखांचे नुकसान झाल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच फुलशेती व्यवसायावर अवलंबुन असणारे मजुर आणि त्यांच्यावर अवलंबुन असणाऱ्या तीन हजार कुटुंबियावर बेरोजगारी व उपासमारीचे संकट असल्याने त्यांच्या उपजिविकेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१३-०५-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई देण्याची तरतूद कृषी तथा फलोत्पादन विभागांतर्गत सुरु असलेल्या कोणत्याही प्रचलित योजनेत नाही किंवा अशा प्रकारे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी कृषी विभागांतर्गत स्वतंत्र

योजना अस्तित्वात नाही. त्यामुळे कोरोना लॉकडाऊनमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे शक्य होणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोरखेडा शिवारात (ता.रावेर, जि.जळगाव) भावंडाची हत्या झाल्याबाबत

**(३) ५९६६ (२०-११-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरखेडा शिवारातील (ता.रावेर, जि.जळगाव) केळीबागेत रखवालदारांच्या घरात गाढ झोपेत असलेल्या चार अल्पवयीन भावंडाची अज्ञातांनी कुऱ्हाडीने निर्घृण हत्या केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त हत्याकांडात एका अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग झाल्याचे शवविच्छेदनात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेमुळे जळगांव जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रात संताप व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असलयास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आरोपींना अटक करुन कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१३-०५-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करून गुन्हयातील आरोपीतास अटक करण्यात आली असल्याने जळगांव जिल्हा घटकात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही.
(४) सदर प्रकरणी रावेर पोलीस स्टेशन येथे भाग- ५ गु.र.नं. १८८/२०२० भा.दं.वि.स. कलम ३०२, ३७६(अ), ४५२, २०१ सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा सन २०१२ चे कलम ४,६,८,१०,१२ प्रमाणे दिनांक १६/१०/२०२० रोजी आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपीतास अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाकडुन आरोपीस दिनांक २३/१०/२०२० पासून दिनांक ३१/१०/२०२० रोजी पावेतो पोलीस कस्टडी मिळाली आहे. सद्य:स्थितीत सदर गुन्ह्यातील आरोपीविरूध्द दिनांक १२/१२/२०२० रोजी मा.अति. जिल्हा व सत्र न्यायालयात भुसावळ येथे दोषारोपपत्र दाखल केले असून त्याचा स्पेशल केस नं. १४२/२०२० असा आहे. सद्य:स्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे. तसेच सदर खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात येणार असून सदर प्रकरणी विशेष सरकारी वकील म्हणून श्री.उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महिला सुरक्षितता पुढाकार योजना मुंबई शहरात अंमलबजावणी करण्याबाबत

**(४) ६४७८ (१६-०३-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांवर परिणामकारकरित्या आळा घालण्याच्यादृष्टीने त्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी केंद्र शासनाने देशातील निवडक आठ शहरांसाठी महिला सुरक्षितता पुढाकार योजना लागू केलेली असून त्यात महाराष्ट्रातील मुंबई शहराचा समावेश करण्यात आलेला असून ही योजना सन २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२०-२०२१ या तीन वर्षात राबविण्याचे ठरविण्यात आलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेमध्ये केंद्र/राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात ठरविण्यात आला होता व योजनेसाठी मुंबई शहरासाठी रुपये २५२ कोटी एवढा निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येणार होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेसाठी केंद्र शासनाकडून प्रत्यक्षात किती निधी केव्हा उपलब्ध करण्यात आला आहे, राज्य शासनाने आपल्या हिश्श्याचा किती निधी केव्हा उपलब्ध केलेला आहे व या दोन्ही निधींचा विनियोग कशाप्रकारे केव्हा करण्यात आला आहे, उक्त योजनेची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१३-०५-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

(३) व (४) i) वित्तीय वर्ष सन २०१८-१९ या पहिल्या वर्षासाठीचे केंद्राचे ६० टक्के रुपये ८७.४७ कोटी व राज्य शासनाचे ४० टक्के रुपये ५८.३२ कोटी असे मिळून रुपये १४५.७९ कोटी निधी उपलब्ध झाला आहे.

ii) वित्तीय वर्ष सन २०१९-२० या दुसऱ्या वर्षासाठीचे केंद्राचे ६० टक्के रुपये ५६.१७ कोटी प्राप्त झाले. असे मिळून रुपये २०१.९५ कोटी इतका निधी प्राप्त झालेला आहे.

iii) प्राप्त निधी पैकी अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, बृहन्मुंबई यांचे कार्यालयाच्या स्तरावर वित्तीय वर्ष २०१९-२० मध्ये रुपये १.७५ कोटी व वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये रुपये १०.७५ कोटी असे एकूण रुपये १२.१० कोटी इतका निधी खालील बाबींवर खर्च करण्यात आलेला आहे :-

अ) प्रकल्प सल्लागार म्हणून नेमलेल्या मे. पीडब्लूसी या कंपनीस मानधन म्हणून रुपये २.७६ कोटी अदा केले आहेत.

ब) मुंबई महानगर पालिकेला शहरात निर्जनस्थळी अंधारमय रस्त्यावर पथदिवे लावण्यासाठी रुपये ८.७५ कोटी इतका निधी वर्ग करण्यात आला आहे.

क) मुंबई शहरात सार्वजनिक ठिकाणी जनजागृती मोहिम राबविण्यासाठी केलेल्या जाहिरातीसाठी रुपये ५४ लाख अदा करण्यात आलेले आहेत.

ड) सदर प्रकल्पासाठी आवश्यक असणारे माहिती तंत्रज्ञान संदर्भातील संगणकीय साहित्य खरेदी केलेले आहे. त्याचे देयके रुपये १० लाख इतके आहे.

असा सर्व खर्च मिळून रुपये १२.१० कोटी इतका निधी सदर प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने खर्च करण्यात आलेला आहे.

सदर योजनेच्या रुपये १४७.४८ कोटी इतक्या खर्चाच्या प्रस्तावास दिनांक १४/०५/२०२१ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ शेतकऱ्यांना देण्याबाबत

**(५) ८७९५ (२१-०६-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले कर्जमाफी योजनेचा लाभ ज्या शेतकऱ्यांना मिळालेला नाही, शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेचाही विमा उतरविलेला नाही, तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजना उतरविण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ जुलै, २०२० रोजी संपली असल्याने उपरोक्त शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहिले असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेची मुदत संपल्यानंतर ज्या शेतकऱ्यांचा पीक विमा उतरवण्यात आला नाही अशा शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१३-०५-२०२२) :** (१) हे खरे नाही.

सदर योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. सन २०२० मध्ये महात्मा ज्योतिबा फुले कर्ज माफी योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे नविन कर्ज न मिळालेल्या शेतकऱ्यांनाही योजनेत भाग घेता येतो. सदर शेतकरी योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बिगर कर्जदार शेतकरी

म्हणून योजनेमध्ये सहभागी होता येत होते. योजनेत सहभागी होण्याची अंतिम दिनांक ३१ जुलै, २०२० होती.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील रस्ता व पुलांच्या दुरुस्ती बांधकामाबाबत

**(६) ९१९४ (१७-०६-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव, बाभूळगांव व नर्सी नामदेव वारी (ता.सेनगांव, जि.हिंगोली) मार्गावरील जोड रस्त्यालगतच्या पुलाची दुरूस्ती कोणत्या योजनेतून केली जात आहे, त्याचप्रमाणे सुलदली बू. गावाला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरेगांव, बाभूळगांव व नर्सी नामदेव वारी मार्गावरील जोड रस्त्याचे काम डांबराऐवजी माती मिश्रीत लेप लावून केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगोली तालुक्यातील डिग्रस क-हाळे पाटी ते लोहगांव दरम्यान असलेल्या दाटेगांव पुलाचे बांधकाम सुरू करण्यात आले नसून रिसोड, सेनगांव, नर्सी नामदेव, केसापूर, लोहगांव ते डिग्रस क-हाळे फाटा येथून हत्ता पाटी, जांबदया, आडोळ, खिल्लानर, भोशी-नागझरी व करंजाळा अशा ३० ते ४० गावांच्या रहदारीसाठी दाटेगांव पुलावरून प्रवास करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्ता व पुलावरुन वाहतूक करताना कोरोना रूग्ण, गरोदर महिला, सर्पदंश झालेल्या व्यक्ती व इतर रूग्णांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गोरेगांव, बाभूळगांव व नर्सी नामदेव वारी मार्गावरील जोड रस्त्याचे काम डांबराऐवजी माती मिश्रीत लेप लावून करणाऱ्या शासकीय अधिकारी व संबंधित कंत्राटदार यांच्यावर कारवाई करुन सदर रस्त्याची व जोड रस्त्यालगत असलेल्या पूलाची, सुलदली बू. गावाला

जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची तसेच डिग्रस क-हाळे पाटी ते लोहगांव दरम्यान असलेल्या दाटेगांव पुलाचे बांधकाम/दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) :** (१) गोरेगाव ते बाभूळगाव पाटी हा रस्ता राज्यमार्ग क्र.२५८ दर्जाचा व बाभूळगाव ते बाभूळगाव पाटी हा भाग प्रजिमा-२७ आहे. सद्य:स्थितीत दोन्ही रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत असून सदर रस्त्यावरील प्रगतीतील कामामध्ये पुल व पुलमोऱ्या दुरूस्ती अथवा बांधकामाचा समावेश नाही.

होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे आहे.

(५) व (६) सदर जोड रस्त्याचे काम डांबराऐवजी माती मिश्रीत लेप लावुन केले नाही, यास्तव, संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सुलदली बु. गावाला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची दुरूस्ती, जिल्हा परिषद अंतर्गत विशेष दुरूस्ती योजना कार्यक्रम अंतर्गत प्रस्तावित आहे.

दिग्रज दाटेगाव रस्ता कि.मी.४/५०० ते ५/५०० हा भाग खराब झाल्यामुळे सदर भागाचे नुतनीकरण मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत मंजूर असून त्यामध्ये सदर ठिकाणी नवीन पुलाचे बांधकाम समाविष्ट आहे. या अनुषंगाने प्रत्यक्ष काम हाती घेण्याबाबतची पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## अकोला येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी आवश्यक असलेली पदे भरण्याबाबत

**(७) ९२२९ (१०-०६-२०२१) डॉ.रणजित पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी शासनाने आवश्यक असलेली पदे मंजूर केली असताना फक्त पदभरती अभावी सदर रुग्णालय सुरू करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालय हे कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर रुग्णसेवेसाठी सुरू करावे अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालय सुरू करण्यासाठी तेथे पद भरती करून कोरोना बाधित रुग्णांच्या उपचारासाठी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१९-०५-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय खरे आहे.

(३) व (४) केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना (PMSSY-III) अंतर्गत अकोला, औरंगाबाद, लातूर आणि यवतमाळ या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत अतिविशेषोपचार रुग्णालय सुरू करण्याकरीता प्रथम टप्प्याकरीता आवश्यक ८८८ पदांची निर्मिती दिनांक ०८/०१/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. पद भरतीच्या अनुषंगाने वर्ग-अ व वर्ग-ब संवर्गातील अतिविशेषोपचार विषयातील सरळसेवेचे प्राध्यापक-१६, सहयोगी प्राध्यापक-२० व सहायक प्राध्यापक-९० तसेच मुख्य प्रशासकीय अधिकारी-६ व प्रशासकीय अधिकारी-२२ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आले आहे. त्यानुसार आयोगाकडून जाहिरात प्रसिध्द झालेली आहे. त्याचप्रमाणे रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. वर्ग-३ संवर्गाची पदे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २२/०४/२०२१ च्या परिपत्रकानुसार संचालनालयामार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच वर्ग-४ संवर्गाची पदे बाह्यस्त्रोताने भरण्याबाबत सूचना संबंधित संस्थेत देण्यात आल्या आहेत.

---

## मराठी व उर्दू माध्यमांच्या शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्याबाबत

**(८) ९५०८ (१३-०७-२०२१) श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत आसगावकर, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय/अशासकीय मराठी, उर्दू व हिंदी अनुदानित व विनाअनुदानित सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्याबाबत शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (३१-०३-२०२२) :** (१) महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाचे वीज दर आदेश दिनांक १६/०२/२०१२ अन्वये मा.आयोगाने उच्चदाब व लघुदाबावर सार्वजनिक सेवा (public services) ही नवी वर्गवारी लागू केली. या वर्गवारीमध्ये शैक्षणिक संस्था व शासकीय रुग्णालय यांचा समावेश करण्यात आला असून त्यानुसार राज्यातील शासकीय/अशासकीय मराठी, उर्दू व हिंदी अनुदानित व विनाअनुदानित सर्व शाळांना अनुक्रमे सार्वजनिक सेवा शासकीय सेवा/अन्य या वर्गवारीनुसार वीजदर आकारण्यात येत आहे. लघुदाब सार्वजनिक सेवा शासकीय वर्गवारीचे दर हे घरगुती वर्गवारीतील दराच्या तुलनेत कमी आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौ.उसर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय उभारण्याबाबत

**(९) ९६८६ (१५-०७-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.उसर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील ३४ एकर जमिनीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय उभारण्याबाबत मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री, मा.पालकमंत्री, रायगड, जिल्हाधिकारी, रायगड व वैद्यकीय शिक्षण संचालक यांचे उपस्थितीत दिनांक २० जुलै, २०२० रोजी व्हिडिओ कॉन्फर्न्सिंगद्वारे झालेल्या बैठकीत शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत मौ.उसर येथील बांधकामाचे ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्याबाबत तसेच, नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय सुरु करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाने त्याबाबत भारतीय आयुर्विज्ञान परिषद, दिल्ली व केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा असा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संरक्षक भिंत बांधण्याबाबत तसेच, नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय सुरु करण्यासंदर्भात तसेच निधी उपलब्धतेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१९-०५-२०२२)** : (१) जिल्हा रायगड येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रूग्णालय उभारण्याकरीता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांनुसार आावश्यक जागा उपलब्धतेसंदर्भात दिनांक २०/०७/२०२० रोजी व्हिडीओ कॉन्फर्न्सिंगच्या माध्यमातून बैठकीचे आयोजन करण्यात आल्याची बाब खरी आहे.

मौ.उसर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील एकूण २१/१०/१४ हे.आर.चौ.मी. जमीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रूग्णालय उभारण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या नावे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

(२) व (३) अलिबाग येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ५०० रूग्ण खाटांचे संलग्नित रूग्णालय बांधकामासाठी रुपये ४०६.९६ कोटी इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास दिनांक १४/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांनी दिनांक २४/११/२०२० रोजी याबाबतचा प्रस्ताव राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली व केंद्र शासनास सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून उद्योगासाठी भूखंड घेऊनही तेथे उद्योग सुरु केलेले नसल्याबाबत

**(१०) ९७६९ (१३-०७-२०२१) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ असलेल्या अनेक जिल्ह्यात उद्योगासाठी भूखंड वितरीत करण्यात आले असून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत हजारो व्यक्तींनी भूखंड घेऊन तेथे उद्योग सुरु केलेले नसल्याची बाब निदर्शनास आलेली असून त्यानुषंगाने उद्योग सुरु न करण्यात आलेले १८०० भूखंड माहे फेब्रुवारी,२०२१ च्या अखेरच्या सुमारापर्यंत परत घेण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योग सुरु करण्यासाठी वितरीत करण्यात आलेल्या भूखंडांपैकी एकूण किती भूखंडावर उद्योजकांनी उद्योग सुरु केले तसेच विना वापर असलेले भूखंड ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, राज्यातील एम.आय.डी.सी ने जिल्हानिहाय यापूर्वी वितरित केलेल्या भूखंडावर बहुतांश ठिकाणी अद्यापही उद्योग सुरू झालेले नसल्याने एमआयडीसीतील भूखंड वापराविना पडून असल्याने नवीन उद्योजकांना आपले नवीन उद्योग सुरू करण्यासाठी भूखंड उपलब्ध होत नसून नवीन उद्योगधंद्यांना चालना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनेक जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ असलेल्या अनेक जिल्हयातील उद्योगासाठी वितरीत केलेले परंतु विनावापर पडून असलेले भूखंड ताब्यात घेऊन ते नवीन उद्योजकांना वितरीत करुन नवीन उद्योगधंद्यांना चालना मिळावी याद्दष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (१३-०५-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे जून-२०१६ ते फेब्रुवारी-२०२१ या कालावधीमध्ये मऔवि महामंडळाने १३३० भूखंड परत घेतलेले आहेत.
(२) म.औ.वि. महामंडळाच्या विविध औद्योगिक क्षेत्रातील एकूण २३४८ अविकसित भूखंड आहेत. त्या भूखंडांचा ताबा व प्राथमिक करारनामा यानुसार त्यांच्या विकास कालावधीनंतर त्यांनी केलेली परिणामकारक कार्यवाही पाहून त्यांना मुदतवाढ देण्याचे महामंडळाचे धोरण आहे. त्यानुसार २६० भूखंडांना मुदतवाढ मंजूर केली आहे. उर्वरित भूखंडांचा विकास कालावधी संपल्यानंतर त्यांनी परिणामकारक कार्यवाही पाहून मुदतवाढ देण्याची अथवा भूखंड परत घेण्याबाबत महामंडळाच्या धोरणानुसार कार्यवाही सुरु आहे.
(३) परत घेतलेल्या भूखंडांचे रिक्त यादीत समावेश करुन त्यांचे पुर्नवाटप म.औ.वि. महामंडळाच्या दिनांक ०३/०६/२०१४ रोजीच्या धोरणानुसार करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शेतकरी उत्पादक कंपन्या उभारण्याची योजना यशस्वी करण्याबाबत

**(११) ९९४७ (१३-०७-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, डॉ.रणजित पाटील** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र शासनामार्फत १० हजार शेतकरी उत्पादक कंपन्या उभारण्याची योजना यशस्वी करण्याकरीता पीक पध्दती, कृषी विद्यापीठ, सेवाभावी संस्था यांच्या विविध कार्यक्रमांची सांगड घालण्याची सूचना मा.कृषी मंत्री यांनी प्रशासनाला केल्या असल्याचे माहे मार्च, २०२१ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी उपसंस्थांची नेमणूक करण्यात आली तर एका शेतकरी कंपनीत ३०० शेतकरी उत्पादक असतील, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कंपन्यांच्या माध्यमातून राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना कायमस्वरुपी रोजगार व शेतकऱ्यांना पीक पध्दतीनुसार हमीभाव देण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१३-०५-२०२२)** : (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनामार्फत देशभरात राबविण्यात येणाऱ्या १०००० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याची योजना प्रभाविपणे राज्यात राबविण्याच्या दृष्टिने मा.मंत्री (कृषी) यांनी दिनांक २४/०३/२०२१ रोजी त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सदर योजना राज्य शासनाच्या समन्वयाने कृषी व सलंग्न विभागांच्या योजनांची सांगड घालून राबवावी अशा सुचना केल्या आहेत. त्या अनुषंगाने दिनांक ०७ मे २०२१ रोजी केंद्रीय लघू कृषक कृषी व्यापार संघास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

कृषी सहकार व शेतकरी कल्याण विभाग,भारत सरकार,नवी दिल्ली यांनी दिनांक २९/०२/२०२० रोजी देशात “Formation and promotion of १०००० Farmer Producer Organisation” (FPOs) योजना जाहीर केली. दिनांक ०२ जुलै, २०२० च्या पत्रान्वये कृषी सहकार व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेमार्फत योजनेच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. मार्गदर्शक सुचनेत नमुद केलेनुसार योजनेच्या अंमलबजावणीकरीता केंद्र शासनामार्फत SFAC, NABARD, NCDC व NAFED या चार कार्यान्वयन यंत्रणा म्हणून नेमणुक केली आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनांन्वये लाभ घेण्यासाठी एका शेतकरी उत्पादक संस्थेचे डोंगराळ भागासाठी किमान १०० व इतर भागांसाठी किमान ३०० सभासद असावेत.

(३) शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी, कंपनी कायदा १९५६ अंतर्गत झाली असल्याने सदर कंपनीचे स्वतंत्र अस्तित्व आहे. शेतकरी उत्पादक कंपनीच्या व्यवसाय आराखड्यानुसार कंपनीतील भागधारक सभासदांना लाभ होणार आहे.

(४) केंद्र शासनामार्फत देशभरात राबविण्यात येणाऱ्या १०००० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याची योजना, कृषी विभागाच्या समन्वयाने राज्यात राबविण्याकरीता दिनांक २२/०७/२०२० च्या शासन निर्णयान्वये राज्य स्तरावर सचिव (कृषी) यांचे अध्यक्षतेखाली “राज्यस्तरीय सल्लागार समिती” व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली “जिल्हास्तरीय नियंत्रण समिती” स्थापन करण्यात आली आहे. व योजनेत कृषी विभागाच्या समन्वयासाठी दिनांक २२/१०/२०२० च्या शासन निर्णयान्वये जिल्हास्तरीय नियंत्रण समितीचे सदस्य सचिव “प्रकल्प संचालक, आत्मा” यांना घोषित केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्रास जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१२) १०९८६ (०६-०१-२०२२) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्रास शैक्षणिक विस्तारासाठी जागा अपुरी पडत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे उक्त विद्यापीठाने शैक्षणिक, प्रशासकीय विस्तार व विद्यार्थ्यांसाठी इतर सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता लागणाऱ्या जमिनीबाबत महसूल व वन विभागाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील विद्यापीठाच्या मागणीनुसार विद्यापीठास जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०३-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) विद्यापीठाने लातूर उपकेंद्राकरीता गट क्र.५१ मौजे पेट मधील ९.१३ हेक्टर पैकी उर्वरित ५.१३ हेक्टर जमीन हस्तांतरण करण्याबाबत महसूल व वन विभागास विनंती केली आहे. सदर प्रकरणी महसूल व वन विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खारघर, तळोजा, कामोठे आणि नवीन पनवेल आदि सिडको वसाहतीत मुबलक पाणीपुरवठा होत नसल्याबाबत

**(१३) ११३२३ (०६-०१-२०२२) श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खारघर, तळोजा, कामोठे आणि नवीन पनवेल आदि सिडको वसाहतीत मुबलक पाणीपुरवठा होत नसल्यामुळे तेथील नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रहिवासी सोसायट्यांना लाखो रुपये खर्चून टँकरचे पाणी विकत घेऊन तहान भागवावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खारघर तळोजा कॉलनी वेल्फेअर असोसिएशनच्या नेतृत्वाखाली सर्व संघटनांनी एकत्र येऊन सिडको भवनासमोर आंदोलनही केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनुसार सिडकोतील रहिवाशांना सुरळीत पाणीपुरवठा होण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०३-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) सिडकोमार्फ़त संबंधित विभागांना/ नोडस ला पाणीपुरवठा करण्यासाठी एम.आय.डी.सी.चे बारवी, पाताळगंगा स्त्रोत, महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या मोरबे प्रकल्प तसेच न्हावा शेवा टप्पा-१ अंतर्गत भाग भांडवल देऊन वेळोवेळी पाण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

नव्याने विकसित होणाऱ्या गृहप्रकल्पांसाठी व नैना अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या वसाहतीसाठी सन-२०५० पर्यंत लागणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने हेटवणे पाणीपुरवठा योजना (२७० द.ल.लि.), बाळगंगा बाळगंगा पाणीपुरवठा योजना (३५० द.ल.लि.), कोंढाणे पाणीपुरवठा योजना (२५० द.ल.लि.), मोरबे पाणीपुरवठा योजना (२५० द.ल.लि.), व महाराष्ट्र जिवन प्राधिकरण न्हावा शेवा टप्पा १ ते ३ योजनेमधुन (१५४ द.ल.लि.) असा एकूण १११४ द.श.लि. पाणी पुरवठ्याचे नियोजन आहे.

पाणीपुरवठा नियमित व योग्य दाबाने करण्यासाठी टाटा कन्स्लटिंग इंजिनियर्स (TCE) ची नियुक्ती केली असून त्यांच्या सुचनेनुसार पाणीपुरवठा समतोल करण्यात आला आहे. महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या पाताळगंगा पंपींग मध्ये सुधारणा करुन नवीन पनवेल, कळंबोली विभागाच्या पाणीपुरवठ्यात सुधारणा करण्यात आली आहे.

भविष्यात गृहनिर्माण प्रकल्पामधुन निर्माण होणाऱ्या सांडपाण्याच्या प्रक्रियेचा व पाणी पुनर्वापर प्रक्रियेचा समावेश नियोजनामध्ये केलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

## मौजे कानडेवाडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील आर.सी.सी. गटारीचे कामास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देऊन उक्त कामास निधी मंजूर करण्याबाबत

**(१४) ११७०७ (०५-०१-२०२२) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कानडेवाडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील वरचे कुप्पे वस्तीमधील सांडपाणी व पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याकरीता आर.सी.सी. गटारीचे काम सन २०२१-२२ च्या स्थानिक विकास निधीमधून करण्याबाबत ग्रामपंचायत कानडेवाडी यांनी मा.ग्रामविकास मंत्री तथा पालक मंत्री, कोल्हापूर यांचेकडे दिनांक २५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांडपाणी व पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होत नसल्याने ग्रामस्थांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने सदर आर.सी.सी. गटारीचे कामास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याबाबत तसेच, उक्त कामास निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) ग्रामपंचायत कानडेवाडी यांनी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या आराखड्यात सदर कामासाठी तरतूद केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय अनुदानित आयुर्वेदिक महाविद्यालयातील अध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१५) १३११७ (३०-०३-२०२२) श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अनुदानित आयुर्वेदिक महाविद्यालयामध्ये सुमारे २७० पेक्षा अधिक अध्यापकांची विविध पदे ६ वर्षापेक्षा अधिक काळापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय अनुदानित आयुर्वेदिक महाविद्यालयामधील अध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०४-०५-२०२२) :** (१) शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयामध्ये अध्यापक संवर्गाची एकूण ६२२ मंजूर पदे आहेत. त्यापैकी २७९ पदे सद्य:स्थितीत रिक्त आहे. मात्र सदर रिक्त पदे ६ वर्षापासून रिक्त नसून त्या-त्या वेळी सेवानिवृत्ती व अन्य कारणांमुळे आणि ५०% पदभरतीबाबत वित्त विभागाच्या निर्देशामुळे रिक्त आहेत.

तसेच, शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांमधील अध्यापकांची सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरीता शासनाने स्थापन केलेल्या निवड मंडळाच्या आदेशाविरोधातील न्यायालयीन प्रकरणामुळे सरळसेवेची पदभरती स्थगित होती. मा.न्यायालयाने प्रस्तुत प्रकरणी दिनांक २३/०३/२०२२ रोजी अंतिम निकाल दिला आहे. यानुसार सरळसेवेची पदे शासन नियमान्वये भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, पदोन्नतीची १००% पदे भरण्यात येत आहेत.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माणिक कॉलनी (ता.कल्याण, जि.ठाणे) वसाहतीच्या पुनर्विकासात अनियमितता व फसवणूक झाल्याबाबत

**(१६) १३२०७ (३०-०३-२०२२) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) पश्चिमेकडील केडीएमसी मुख्यालयाजवळ असलेल्या माणिक कॉलनी वसाहतीच्या पुनर्विकासात अनियमितता आणि फसवणूक

झाल्याच्या तक्रारीनुसार बाजारपेठ पोलीस ठाण्यात केडीएमसीच्या पाच आयुक्तांसह सहाय्यक नगररचनाकार, विकासक आणि वास्तूविशारद अशा १८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कलम ४२०, ४१८, ४१५, ४६०, ४४८, १२० ब, ३४ आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ९ आणि १३ नुसार गुन्हे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने केडीएमसीच्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तसेच विकासक व वास्तुविशारद यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०५-२०२२)** : (१) व (२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयाजवळ असलेल्या माणिक कॉलनी वसाहतीच्या पुनर्विकासात अनियमितता व फसवणूक झाल्याची श्री.अरूण गांधी यांची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.

सदर तक्रारीनुसार मे. कल्याण न्यायालय यांनी दावा क्र.३२७/२०२१ मधील दिनांक १८/०१/२०२२ रोजीच्या आदेशामध्ये पोलीस निरीक्षक, बाजारपेठ पोलीस स्टेशन यांना भारतीय दंड संहितेच्या कलम १५६(३) अन्वये चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे भा.द.वि. च्या कलम ४२०, ४१८, ४१५, ४६७, ४४८, १२०ब, ३४ व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ९ आणि १३ नुसार महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी, विकासक व वास्तुविशारद यांचेविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

याच दाव्यामधील मे.कल्याण न्यायालय यांचेकडील रिव्हीजन ॲप्लीकेशन मध्ये सदर आदेशास दिनांक ०१/०४/२०२२ च्या आदेशान्वये दिनांक ०७/०५/२०२२ पर्यंत स्थगिती देण्यात आली, ही वस्तुस्थिती आहे.

(३) माणिक कॉलनी या रहिवाशी संकुलाला महानगरपालिकेच्या तत्कालीन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार ७० टक्के भाडेकरूंचे संमतीपत्र घेऊन प्रोत्साहनपर चटई क्षेत्रासह बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर भूखंडावरील इमारतीमध्ये पुर्वीच्या भाडेकरूंचे पुनर्वसन करणेकरीता विकासक व महानगरपालिका यांचेकडून वेळोवेळी कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत सदर बांधकाम परवानगीचे अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात दावा दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेतील ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या अस्थायी कर्मचाऱ्यांना महानगरपालिका सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत

**(१७) १३४४८ (३०-०३-२०२२) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सन २००७ पासून ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या अस्थायी संगणकचालक तथा लिपिक व लघुलेखक यांना पदनिर्मिती करुन महानगरपालिका सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत महानगरपालिकेने माहे ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास तसेच यापूर्वीही शासनास प्रस्ताव पाठविला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वृत्तपत्रात रितसर जाहिरात देवून व त्याची मुलाखत घेऊन महानगरपालिकेच्या आस्थापनेवर घेण्यात आले असून वेळोवळी स्थायी समिती व महासभा ठरावही पारित केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावास मंजुरी देवून आस्थायी कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०५-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) दिनांक २६/०२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा आकृतिबंध मंजूर करण्यात आलेला असून त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर लिपिक-टंकलेखकाची एकूण १६२ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील अस्थायी संगणक चालक व लघुलेखक यांना "समान काम समान वेतन द्यावे किंवा किमान वेतन" याबाबतचा आवश्यक तो निर्णय महानगरपालिका स्तरावर घेणेबाबत आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना दिनांक १०/०१/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील सहा जिल्हयांच्या मागणीनुसार निधी देण्याबाबत

**(१८) १३५१२ (३०-०३-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील सहा जिल्हयांपैकी तीन जिल्हयांच्या निधीला सन २०२२-२३ या वर्षाकरीता दिनांक २१ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर जिल्हयांच्या आराखड्याच्या मागणीच्या तुलनेत कमी निधी मंजूर करण्यात आला असून नागपूर, वर्धा व गडचिरोली या जिल्हयांच्या वाढीव निधीच्या मागणीला मंजुरी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विदर्भातील सहा जिल्हयांपैकी भंडारा, गोंदिया व चंद्रपूर जिल्हयांच्या आराखड्याच्या मागणीनुसार निधी देण्याबाबत तसेच नागपूर, वर्धा व गडचिरोली या जिल्हयांच्या वाढीव निधीला मंजुरी देवून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२८-०४-२०२२) :** (१), (२), (३) व (४)जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) बाबत सन २०२२-२३ करीता अंतिम नियतव्यय निश्चित करण्यासाठी मा.उपमुख्यमंत्री (नियोजन) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २०/०१/२०२२ ते २५/०१/२०२२ या कालावधीत विभागवार राज्यस्तरीय बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर बैठकांमध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) बाबत निधी वाटप सुत्रानुसार, नागरी क्षेत्रासाठी नागरी लोकसंख्येच्या प्रमाणात दिलेल्या निधीनुसार व बैठकीत झालेल्या चर्चेनुसार सर्वच जिल्हयांचा नियतव्यय अंतिम करण्यात आला आहे. विदर्भातील जिल्हयांकरीता पुढीलप्रमाणे निधी अंतिम करण्यात आला आहे.

| अ.क्र. | जिल्हा | अंतिम करण्यात आलेला निधी (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| १ | नागपूर | ६७८ |
| २ | वर्धा | २२५ |
| ३ | भंडारा | १७५ |
| ४ | गोंदिया | २०० |
| ५ | चंद्रपूर | ३२८ |
| ६ | गडचिरोली | ३०० |

---

## तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यातील विद्यार्थी परिक्षेपासून वंचित राहिल्याबाबत

**(१९) ३४०२५ (१८-०८-२०१७) डॉ.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक २७२२४ ला दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यातील ३६ विद्यार्थ्यांचे नवोदय परिक्षेचे फार्म गटशिक्षणाधिकारी यांनी वेळेत सादर न केल्यामुळे विद्यार्थी परिक्षेपासून वंचित राहिल्याचे दिनांक ०९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना परिक्षेपासून वंचित ठेवणाऱ्या गटशिक्षणाधिकाऱ्यांवर केलेली कारवाई पूर्ण झाली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०३-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) याबाबत वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तिरोडा यांना शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांच्याकडून समज देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने मानक व प्रमाणके पूर्ण करणाऱ्या शाळांना प्रमाणपत्र देण्याबाबत

**(२०) ४९१८५ (०५-०७-२०१४) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील शासन मान्य खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांची (अनुदानित/विनाअनुदानित) संख्या किती आहे,
(२) शिक्षणाचा हक्क लागू असणाऱ्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना मानके व प्रमाणके पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी कोणाकडे आहे,
(३) ठाणे जिल्हयातील किती प्राथमिक, उच्च प्राथमिक शाळांनी मानके व प्रमाणके पूर्ण केली आहेत,
(४) मानके व प्रमाणके पूर्ण करणाऱ्या शाळांना शिक्षणाचा हक्क नियम ११(४) अन्वये त्याबाबतचे प्रमाणपत्र कैंव्हा देण्यात आले आहे,
(५) नसल्यास, प्रमाणपत्रे न देण्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१५-०३-२०२२) :** (१), (२), (३) व (४) ठाणे जिल्हयामध्ये एकूण २७९८ शाळा असून बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अन्वये विहित केलेली मानके व प्रमाणके पूर्ण करणाऱ्या

२०० शाळांना शिक्षणाचा हक्क नियम ११ (४) अन्वये सन २०१९-२०२१ या कालावधीमध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.ठाणे यांच्यामार्फत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.